# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र सरकार अधिसूचना क्रमांक एमआयसीएस - २००७/(३२२/०७) द्वारे स्थापित युएनआय -४ दिनांक २७ सप्टेंबर २०११ आणि सध्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा - २०१६ द्वारे शासित राज्य विद्यापीठ (महाराष्ट्र कायदा क्रमांक सहा, २०१७)

## पदव्युत्तर शैक्षणिक संगणकशास्त्र विभाग

**जा. क्र./ संगणकशास्त्र विभाग/ ५३ /२०२५** **दि. २५/०७/२०२५**

प्रति,

प्राचार्य,

सर्व संलग्नित महाविद्यालये,

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय: "विकसित महाराष्ट्र २०४७" या विषयावर घोषवाक्य स्पर्धेमध्ये सहभागाबाबत.

महोदय/महोदया,

नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. २ जून २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार "विकसित महाराष्ट्र २०४७" या दीर्घकालीन दृष्टीकोनात्मक दस्तऐवज (Vision Document) तयार करण्याच्या उद्देशाने राज्यभरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

त्याअंतर्गत प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासन या चार आधारस्तंभांवर आधारित घोषवाक्य तयार करण्यासाठी स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेसाठी गोंडवाना विद्यापीठाच्या वतीने सर्व संलग्नित महाविद्यालयांना सहभागासाठी आमंत्रित करण्यात येत आहे.

कृपया खालीलप्रमाणे स्पर्धेचे नियम व अटी वाचून आपल्या महाविद्यालयातून सहभाग निश्चित करावा:

आपला विश्वासू,

(डॉ. मनीष देशपांडे )

आयोजन समिती सदस्य

विकसित महाराष्ट्र २०४७ घोषवाक्य स्पर्धा

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

१) स्पर्धेचे नियम व अटी संलग्नित केले आहे.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र सरकार अधिसूचना क्रमांक एमआयसीएस - २००७/(३२२/०७) द्वारे स्थापित युएनआय -४ दिनांक २७ सप्टेंबर २०११ आणि सध्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा -२०१६ द्वारे शासित राज्य विद्यापीठ (महाराष्ट्र कायदा क्रमांक सहा, २०१७)

## पदव्युत्तर शैक्षणिक संगणकशास्त्र विभाग

दि. २५/०७/२०२५

जा. क्र./ संगणकशास्त्र विभाग/ ५३/२०२५

### घोषवाक्य स्पर्धा – नियम व अटी

१. घोषवाक्याचा विषय: विकसित महाराष्ट्र २०४७

२. घोषवाक्याचे स्वरूप: मराठी भाषेत, ५ ते १० शब्दांमध्ये, सुस्पष्ट, नाविन्यपूर्ण व प्रभावी असावे.

३. घोषवाक्य तयार करताना खालील चार आधारस्तंभांचा विचार आवश्यक आहे:

- ✓ प्रगतीशील
- ✓ शाश्वत
- ✓ सर्वसमावेशक
- ✓ सुशासन

४. पात्रता:

प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी

५. प्रत्येक महाविद्यालयाने एक समन्वयक नेमावा, जो सर्व घोषवाक्य संकलित करून विद्यापीठाला एकत्रितपणे पाठवेल.

६. घोषवाक्य सादर करताना खालील तपशील नमूद करावा:

- ❖ सहभागीचे पूर्ण नाव
- ❖ संबंध (विद्यार्थी / प्राध्यापक / पालक / इतर)
- ❖ संपर्क क्रमांक
- ❖ घोषवाक्य (मराठीत)

७. सादर करण्याची अंतिम तारीख: **२९ जुलै २०२५.**

८. घोषवाक्य पाठविण्याचा ई-मेल पत्ता: pgtdmarathi.unigug@gmail.com

९. पुरस्कार व गौरव:

- ➢ विद्यापीठ स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक निवडले जातील.
- ➢ निवडलेले घोषवाक्य शासनस्तरावर शिफारस केले जातील.
- ➢ विजेत्यांना प्रमाणपत्र देण्यात येईल.

आपणास नम्र विनंती आहे की, आपल्या महाविद्यालयातील सर्व घटकांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित करून आपल्या महाविद्यालयाचा सहभाग निश्चित करावा व विद्यापीठास आवश्यक माहिती वेळेत पाठवावी.

आपले सहकार्य अपेक्षित आहे.

आपला विश्वासू,

(डॉ. मनीष देशपांडे )

आयोजन समिती सदस्य

विकसित महाराष्ट्र २०४७ घोषवाक्य स्पर्धा

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.